# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

जा.क्र./कोरोना कक्ष/ १९७ /२०२१
दिनांक - ०७/०३/२०२१

**जळगांव शहर महानगरपालिकेत कोविड केअर सेंटर/रुग्णालये/ दवाखान्याकरीता वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स ही पदे तात्पुरत्या स्वरुपात दरमहा एकत्रित मानधनावर भरणेबाबत**

जळगांव शहर महानगरपालिकेच्या दवाखाना विभागांतर्गत कोरोना विषाणूचे पार्श्वभूमीवर कोविड केअर सेंटर /रुग्णालये /दवाखान्याकरीता दरमहा एकत्रित मानधनावर खालील तक्त्यात नमूद केलेली पदे हंगामी स्वरुपात ६ महिने कालावधीकरीता भरावयाची आहेत. सदर पदांचे पदनाम,शैक्षणिक अर्हता, याबाबतचा तपशील व अटी व शर्ती खालील प्रमाणे-

**(अ) पदनाम व शैक्षणिक अर्हता**

| अनु.क्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी ( M.B.B.S/B.A.M.S/B.H.M.S/B.U.M.S/B.D.S ) | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील M.B.B.S/B.A.M.S/B.H.M.S/B.U.M.S/B.D.S पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. २. महाराष्ट्र मेडीकल कौन्सील/सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडिसीन यांचेकडील नोंदणी बंधनकारक. |
| २ | स्टाफनर्स | १. B.SC./M.SC.NUSRSING/B.P.N.A /R.G.N.M. कोर्स पूर्ण असणे आवश्यक आहे. २. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सील कडील रजिस्ट्रेशन आवश्यक |
| ३ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | कोणत्याही शाखेची पदवी / MSCIT / MARATHI- ३० , ENGLISH -४० |
| ४ | वार्ड बॉय | १० वी पास |
| ५ | आया | १० वी पास |

**(ब)दरमहा एकत्रित मानधन**

उपरोक्त नमूद तक्त्यात नमूद केलेल्या वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स पदांना खालील प्रमाणे मानधन अदा करण्यात येईल..

| अनु.क्र | शैक्षणिक अर्हता व पद | एकत्रित मानधन दरमहा |
|---|---|---|
| १ | M.B.B.S | दरमहा रुपये ६०,०००/- |
| २ | B.A.M.S/ B.U.M.S | दरमहा रुपये ३०,०००/- |
| ३ | STAFF NURSE | दरमहा रुपये २०,०००/- |
| ४ | Data Entry Operator | दरमहा रूपये १७,०००/- |
| ५ | WARD BOY/AAYA | ४००/- रूपये प्रति दिन |

**(क) अटी व शर्ती :-**

१. सद्यपरिस्थिती लक्षात घेता संपूर्ण राज्यामध्ये लॉकडाऊनची परिस्थिती असून प्रवासाची कोणतीही साधने उपलब्ध नाहीत. तसेच प्रवासावर काही प्रमाणात बंधने आहेत.त्यामुळे वरीलप्रमाणे नमूद पदांकरीता स्थानिक उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

२. **यासाठी इच्छुक पात्रताधारक उमेदवारांनी खालील पैकी कोणत्याही दिवशी विहीत वेळेत अर्ज व आवश्यक असलेल्या संपूर्ण कागदपत्रे /प्रमाणपत्रांसह (मूळ व छायांकीत प्रतीसह) थेट मुलाखतीस उपस्थित रहावे.**

| दिनांक | वार | वेळ |
|---|---|---|
| ०९/०३/२०२१ | मंगळवार | सकाळी ११:०० ते दु.०१:०० वाजेपर्यंत |

टिप :- प्रत्येक आवठवड्याच्या प्रत्येक मंगळवारी सकाळी ११.०० ते ०१.०० या वेळेत थेट मुलाखती घेण्यात येतील. (मंगळवारी प्रशासकीय सुट्टी असल्यास त्याच्या पुढील दिवशी (बुधवार) रोजी घेतल्या जातील.)

**मुलाखतीचे ठिकाण :- प्रमुख वैद्यकीय अधिकारी यांचे कार्यालय, छत्रपती शाहु महाराज रूग्णालय ,शाहु नगर जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव .**

वर नमूद विहीत दिवशी व विहीत वेळेत अर्ज व आवश्यक कागदपत्रे /प्रमाणपत्रासह उपस्थित उमेदवारांची त्याच दिवशी थेट मुलाखत घेण्यात येईल. मुलाखतीसाठी आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे मुलाखतीच्यावेळी सादर न करणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येणार नाही.उमेदवाराने मुलाखतीसाठी येताना सोबत खालील प्रमाणे कागदपत्रे /प्रमाणपत्रे आणावीत.

१. शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे.
२. नोंदणी प्रमाणपत्र (वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स )
३. नूतनीकरण प्रमाणपत्र. (वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स )
४. जन्मतारखेचा पुरावा.
५. ओळखपत्र (आधारकार्ड,वाहनपरवाना,निवडणूक ओळखपत्र, इत्यादी पैकी एक)

३. नेमणूक आदेश निर्गत केल्यानंतर उमेदवारांना दूरध्वनी वरुन संपर्क साधला जाईल तद्नंतर उमेदवाराने तातडीने रुजू होणे बंधनकारक असेल.उमेदवाराने रुजू होतेवेळी कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती म.न.पा.कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

४. मुलाखतीच्यावेळी सादर केलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या प्रती व रुजू होतेवेळी प्रत्यक्ष सादर करावयाच्या प्रतींमध्ये तफावत आढळल्यास उमेदवार रुजू करुन घेतले जाणार नाही, याची स्पष्टपणे नोंद घ्यावी.

५. नियुक्ती देण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी यांना आपत्कालिन परिस्थतीचे अनुषंगाने महापालिका निश्चित करेल अशा कोणत्याही रुग्णालयामध्ये रुग्णसेवा देणे बंधनकारक राहिल. याकरीता ते २४ तास महापालिका सेवेप्रती बांधील राहतील.

६. उमेदवारास कोणताही प्रवासखर्च देय असणार नाही अथवा त्यांना याबाबत कोणतेही सहाय्य करणेत येणार नाही.

७. प्रस्तुतच्या मानधनावर करावयाच्या नेमणूका ह्या पूर्णपणे तात्पुरत्या /हंगामी स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास मनपामधील कोणत्याही पदावर कायमस्वरुपी नेमणूकीचा हक्क सांगता येणार नाही.याबाबत विहीत नमून्यात हमीपत्र लिहून द्यावे लागेल.

८. ज्या दिवशी मनपास सदर पदांची आवश्यकता नसेल,त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय मानधनावरील सेवा संपूष्टात आणण्यात येतील.

९. निवड केलेल्या उमेदवारांना महापालिकेने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल तसेच महानगरपालिकेच्या कोविड केअर सेंटर/दवाखाने/रुग्णालयामध्ये आवश्यकतेनुसार मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे सुचनेनुसार कामकाज करावे लागेल.

१०. वय वर्ष ६० पूर्ण असणाऱ्या उमदवारांनी उपरोक्त नमूद पदांसाठी अर्ज करु नयेत.असे अर्ज अपात्र समजण्यात येतील.

११. सदर उमेदवरांना महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागांतर्गत असणाऱ्या कोविड केअर सेंटर /दवाखाना / रुग्णालयामध्ये कामकाज करावे लागेल. तथापी नेमून दिलेल्या दवाखाना/रुग्णालयामध्ये आवश्यकता नसलेस अन्य ठिकाणी नियुक्ती देण्यात येईल. त्याचबरोबर आवश्यकतेनुसार अन्य रुग्णालये/दवाखान्यामध्ये कामकाज करावे लागेल.

१२. महापालिका विहित करेल त्या सर्व अटी व शर्ती उमेदवारावर बंधनकारक राहतील.

१३. सदरच्या नेमणूका कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवलेले आहेत.

१४. सदर नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची असून निवड झालेल्या उमेदवारांस महापालिकेमध्ये कायमस्वरुपी नोकरीसाठी कोणताही हक्क सांगता येणार नाही.

आयुक्त
जळगांव शहर महानगरपालिका,जळगावं